**मंगळवार, दि.३ सप्टेंबर २०२४ रोजी सायं. ६.०० वा.**
**स्थळ : रोटरी हॉल, स्विमिंग टँकशेजारी, गणेशनगर, सांगली**

- **अ.भा.मराठी नाट्य परिषद,** शाखा सांगली
- **लोकार्पण प्रतिष्ठान, सांगली**
- **रोटरी क्लब ऑफ सांगली**
- **आभाळमाया फौंडेशन, सांगली**

यांच्या संयुक्त विद्यमाने



# निमंत्रण... !

## एका खुसखुशीत आगळ्यावेगळ्या चर्चानाट्याचं !



कुशाग्र, प्रतिभावंत, सर्जनशील, प्रयोगशील, हजरजबाबी...अशी अनेक विशेषणं मराठी साहित्यातील ज्या लाडक्या व्यक्तिमत्वांपासून विलग करता येणार नाहीत...अशा मराठी माणसांच्या मनावर आधिराज्य करणाऱ्या चार साहित्यिकांच्या साहित्यावर आणि जीवनावर बेतलेल्या या प्रयोगासाठी आपणांस आग्रहाचं निमंत्रण !





संवेदनशील लेखकाचं...त्याहीपेक्षा त्याच्यातल्या माणसांचं चर्चानाट्य



**महाराष्ट्र कल्चरल सेंटर, पुणे निर्मित**

# सोहम् कोहम्च्या गोष्टी



**जगणं समृध्द करणारं नाट्य अभिवाचन...**



- लेखक : दत्ता दंडगे
- दिग्दर्शक : अनंत कान्हो

अभिवाचक :

- अनंत कान्हो
- गौरी लागू
- हितेंद्र नाईक
- मोहन माडगूळकर
- सुबोध पंडे



कार्यक्रम वेळेत सुरू होईल, कार्यक्रमाचा अवधी १ तास ४५ मि.

# 'सोहम कोहमच्या गोष्टी' चर्चानाट्याचे मंगळवारी अभिवाचन

सांगली : 'सोहम कोहमच्या गोष्टी' या नाट्याच्या अभिवाचनाचा प्रयोग होणार आहे. मंगळवार दि. ३ सप्टेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता रोटरी हॉल, गणेशनगर, सांगली येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या प्रयोगाचे लेखन दत्ता दंडगे यांनी तर दिग्दर्शन अनंत कान्हो यांनी केले आहे, अशी माहिती मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हनकर, लोकार्पण प्रतिष्ठानचे अध्यक्ष शहाजीराव जगदाळे, आभाळमाया फाउंडेशनचे अध्यक्ष प्रमोद चौगुले व रोटरी क्लब ऑफ सांगलीचे अध्यक्ष मनीष मराठी यांनी दिली. डॉ. दयानंद नाईक, महेश कराडकर, श्रीनिवास जरंडीकर, अशोक रेळेकर, अभिजित पाटील हे संयोजन करीत आहेत.

# अ. भा. म. नाट्य परिषद, शाखा सांगली.

आयोजित

**PNG** Since 1832

**मे.पुरुषोत्तम नारायण गाडगीळ**
सराफ आणि जव्हेरी
वैभवशाली परंपरा सुवर्णमयी शुध्दतेची

पी.एन.जी. महाकरंडक आंतरमहाविद्यालयीन

# एकांकिका

स्पर्धा २०२४

## निकाल

### सांघिक



**दत्ताजीराव कदम आर्टस् सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी**
एकांकिका–माई

**आर.आय.टी, इस्लामपूर**
एकांकिका–व्हाय नॉट

**मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे**
एकांकिका–स्किम

**डी.वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजि.अँड टेक्नॉलॉजी, कोल्हापूर**
एकांकिका–पिंडग्रान

**दिग्दर्शन**

महेश गवंडी (माई)
डी.के.सी. ,इचलकरंजी
श्रेयश, शिरीश (स्किम)
मॉडर्न कॉलेज, पुणे
अभिषेक पवार (व्हाय नॉट)
आर. आय.टी., इस्लामपूर

**स्त्री–अभिनय**

सुचिता तारळेकर (माई)
डी.के.सी.,इचलकरंजी
पूर्वा कारेकर (उंच माझा झोका गं)
विलिंग्डन महाविद्यालय, सांगली
श्रावणी मारकड (पडदा)
न्यु कॉलेज, कोल्हापूर

**पुरुष–अभिनय**

समर्थ तपकिरे (पिंडग्रान)
डी.वाय. पाटील, कोल्हापूर
सौमित्र कागलकर (व्हाय नॉट)
आर. आय.टी., इस्लामपूर
ऋतिक रास्ते (फिर्याद)
टी. जे. कॉलेज, पुणे

**नेपथ्य**

सुमित शेलार (इंद्रायणी)
शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय, पुणे
हर्षल कांबळे (पॉझिटीव्ह)
आर्टस–कॉमर्स कॉलेज, नागठाणे
करण परदेशी (बी अ मॅन)
अप्पासाहेब जेधे महाविद्यालय,पुणे

**पार्श्वसंगीत**

प्रसाद पोतदार (यात्रा)
डी. आर. के., कोल्हापूर
साक्षी कांबळे (व्हाय नॉट)
आर. आय.टी., इस्लामपूर
मानसी,गणेश,वासुदेव(पडदा)
न्यु कॉलेज, कोल्हापूर

**प्रकाश योजना**

आर्यन व्हनखेडे (उंच माझा झोका गं)
विलिंग्डन महाविद्यालय, सांगली
अभिषेक स्वामी(यात्रा)
डी. आर. के., कोल्हापूर
निरंजन पाटील, विवेक जाधव(पिंडग्रान)
डी.वाय. पाटील, कोल्हापूर

**विजेत्या महाविद्यालयांचे आणि विद्यार्थी कलाकारांचे हार्दिक अभिनंदन....**

सर्व सहभागी महाविद्यालयाचे मनापासून आभार



# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पुरस्कार जाहीर

- ऋषिकेश बोडस, भीमराव धुळुबुळूसह अनेकांना पुरस्कार
- ४ नोव्हेंबर रोजी सांगलीत होणार वितरण
- प्रसिद्ध नाटककार अतुल पेठे, तारा भवाळकर यांची प्रमुख उपस्थिती

प्रतिनिधी
सांगली

अखिल भारतीय नाट्य परिषद शाखा सांगली तर्फे रंगभूमीशी निगडित उल्लेखनिय कार्य करणाऱ्या व्यक्तींना, संस्थांना विविध पुरस्कार देउन सन्मानित करण्यात येत असते. यंदाचे पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हणकर यांनी दिली.

यंदाचे हे आठवे वर्ष असून, यावर्षी काकासाहेब खाडिलकर जीवनगौरव पुरस्कार, ऋषिकेश बोडस, आचार्य अत्रे प्रतिभा रंग पुरस्कार भीमराव धुळूबुळू, नाना ताडे नाट्यस्वर पुरस्कार विजयराव कुलकर्णी, अरुण पाटील नाट्य तंत्र पुरस्कार प्रसाद गद्रे, दिलीप परदेशी नाट्यरंग पुरस्कार अरुण कापसे, श्रीनिवास शिंदगी बालरंगभूमी पुरस्कार मोहन दिंडे, विशेष सन्मान पुरस्कार नाट्यशुभांगी नाट्यसंस्था जयसिंगपूर, डॉ. मधु आपटे कलावंत पुरस्कार किशोर चव्हाण, धनश्री गाडगीळ यांना जाहीर करण्यात आला आहे.

सोमवार ४ नोव्हेंबर रोजी भावे नाट्यगृह येथे सायंकाळी पाच वाजता पुरस्कार सोहळा आयोजित केला आहे. प्रसिद्ध नाटककार अतुल पेठे आणि लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक, ९८ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या नियोजित अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा पार पडणार आहे. यावेळी 'नमन नटवरा' हा पुरस्कार प्रदान समारंभापूर्वी, निवडक नाट्यगीतांचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. यामध्ये सुकृत ताम्हनकर, धनश्री गाडगीळ सहभाग नोंदविणार आहेत. तर त्यांना विनायक हसबनीस (तबला), श्रेयस कुलकर्णी (ऑर्गन) साथ देणार आहेत. यावेळी सर्व नाट्यरसिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन परिषदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

याचे आयोजन डॉ. भास्कर ताम्हनकर यांच्यासह अंजली भिडे, विशाल कुलकर्णी, प्रशांत जगताप, अपर्णा गोसावी, श्रीनिवास जरंडीकर, सचिन पारेख, प्रशांत गोखले, मकरंद कुलकर्णी, रामचंद्र कोटणीस, कुलदीप देवकुळे आदींनी केले आहे.

# सांस्कृतिक दारिद्र्य प्रचंड; अभिजात मराठीचे कसे होणार?

## अतुल पेठे यांचा सवाल; रंगभूमी दिनाच्या पूर्वसंध्येला रंगला सत्कार सोहळा

■ सकाळ वृत्तसेवा

सांगली, ता. ४ : "गेल्या अनेक वर्षांत दर्जेदार, हेवा वाटेल, अशी नाट्यनिर्मिती झाली नाही. जीव ओतून केलेला प्रयोग रसिकांच्या मनाचा ठाव घेत असतो. पूर्वीची रंगभूमी अगदी नियोजनपूर्वक संपवली जात आहे. परंपरा टिकल्या तरच आपली संस्कृती जिवंत राहते. ती माहिती असेल तर नवनिर्मिती शक्य आहे. दुर्दैवाने ते अलीकडच्या काळात होत नाही. हे सांस्कृतिक दारिद्र्य संपता संपत नाही. कोणत्या तोंडाने अभिजात मराठी म्हणून मिरवणार आहोत," असा खडा सवाल प्रसिद्ध नाट्यलेखक, दिग्दर्शक, अभिनेते अतुल पेठे यांनी केला.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या शाखा सांगलीतर्फे रंगभूमीशी निगडित उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती, संस्थांना विविध पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला, त्या वेळी ते बोलत होते. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या नियोजित अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर अध्यक्षस्थानी होते.

पेठे म्हणाले, "समाजमाध्यमांनी समाज अधःपतित झाला आहे. रस्त्यावर उत्सव, सण साजरे करून आपण कोणत्या परंपरेला गोंजारत आहोत? वृद्ध, लहान मुलांचे फटाके किंवा डीजेमुळे काय हाल होतात, याचा विचार केला पाहिजे."



सांगली : अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या सांगली शाखेतर्फे रंगभूमीशी निगडित उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती, संस्थांना अभिनेते अतुल पेठे व डॉ. तारा भवाळकर यांच्याहस्ते सोमवारी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

काकासाहेब खाडिलकर जीवनगौरव पुरस्कार ऋषिकेश बोडस यांना, आचार्य अत्रे प्रतिभारंग पुरस्कार भीमराव धुळबुळू यांना, नाना ताडे नाट्यस्वर पुरस्कार विजयराव कुलकर्णी यांना, अरुण पाटील नाट्यतंत्र पुरस्कार प्रसाद गद्रे यांना, दिलीप परदेशी नाट्यरंग पुरस्कार अरुण कापसे यांना, श्रीनिवास शिंदगी बालरंगभूमी पुरस्कार मोहन टिंडे यांना, तर डॉ. मधू आपटे कलावंत पुरस्कार किशोर चव्हाण व धनश्री गाडगीळ यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. जयसिंगपूर येथील नाट्यशुभांगी नाट्यसंस्थेला विशेष सन्मान पुरस्कार देण्यात आला. सचिन पारेख यांनी पुरस्कारप्राप्त मान्यवरांचा परिचय करून दिला. अपर्णा गोसावी यांनी सूत्रनिवेदन केले. डॉ. भास्कर ताम्हणकर यांनी प्रास्ताविक केले. प्रशांत गोखले यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. अखिल महाराष्ट्र नाट्यविद्यामंदिर समितीचे अध्यक्ष डॉ. शरद कराळे, विशाल कुलकर्णी, प्रशांत जगताप, श्रीनिवास जरंडीकर, मकरंद कुलकर्णी, प्रा. गौतमीपुत्र कांबळे, नामदेव कस्तुरे, महेश कराडकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. कुलदीप देवकुळे यांनी आभार मानले.

### 'नमन नटवरा'ने रसिक मंत्रमुग्ध

■ पुरस्कार प्रदान समारंभापूर्वी निवडक नाट्यगीतांच्या मैफलीला प्रतिसाद मिळाला. सुकृत ताह्मणकर व धनश्री गाडगीळ यांनी अनेक नाट्यपदांचे बहारदार सादरीकरण करून वाहवा मिळवली.

■ विनायक हसबनीस यांनी त्यांना तबला, तर श्रेयस कुलकर्णी यांनी ऑर्गनवर साथ केली. आकांक्षा जोशी हिने खुमासदार निवेदन करून मैफलीची रंगत वाढवली.

# केशवराव भोसले नाट्यगृह नव्हे नाटकच जळाले

## अतुल पेठे : सांगली येथे नाट्य परिषदेच्या वतीने रंगकर्मींचा सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

सांगली : कोल्हापुरातील केशवराव भोसले नाट्यगृह जळाले म्हणजे फक्त एखादी दगड विटांची इमारत जळाली नाही, तर नाटकच जळाले असे मी मानतो, अशा शब्दांत ज्येष्ठ रंगकर्मी अतुल पेठे यांनी खंत व्यक्त केली.

सांगलीत सोमवारी नाट्य परिषदेतर्फे आयोजित केलेल्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. ९८ व्या साहित्य संमेलनाच्या नियोजित अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर उपस्थित होत्या. रंगभूमी दिनाच्या पार्श्वभूमीवर नाट्य क्षेत्रातील गुणवंतांचा सत्कार पेठे आणि डॉ. भवाळकर यांच्या हस्ते करण्यात आला. भावे नाट्यगृहात झालेल्या कार्यक्रमाला परिषदेच्या सांगली शाखेचे अध्यक्ष डॉ. भास्कर ताम्हनकर, डॉ. शरद कराळे, आदी उपस्थित होते. प्रारंभी सुकृत ताम्हनकर व घनश्री गाडगीळ यांनी 'नमन नटवरा' हा नाट्यगीतांचा कार्यक्रम सादर केला. त्यांना तबला साथ विनायक हसबनीस व ऑर्गन साथ श्रेयस कुलकर्णी यांनी केली.



सांगलीत सोमवारी नाट्य परिषदेतर्फे ज्येष्ठ शास्त्रीय गायक ऋषिकेश बोडस यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केले. डॉ. तारा भवाळकर, अतुल पेठे, डॉ. भास्कर ताम्हनकर, डॉ. शरद कराळे, आदी उपस्थित होते. (छायाचित्र : नंदकिशोर वाघमारे)

पेठे म्हणाले, फेसबुकच्या जमान्यात जे काही सुरू आहे, ते विचित्र आहे. यात साहित्यिकांची भूमिका काय आहे हे महत्त्वाचे आहे. समाजाच्या प्रश्नांचे नाटकवाल्यांना भान असावेच, पण नागरिकांनीही ते जपले पाहिजे. सेन्सॉरशिपमुळे विनोद कळत नाहीत, त्यासाठी विवेक असावा लागतो. अशावेळी नाटकवाल्यांवर जबाबदारी वाढते. यावेळी डॉ. भवाळकर यांनीही मनोगत व्यक्त केले.

संयोजन भास्कर ताम्हनकर, अंजली भिडे, विशाल कुलकर्णी, प्रशांत जगताप, अपर्णा गोसावी, श्रीनिवास जरंडीकर, सचिन पारेख, प्रशांत गोखले, मकरंद कुलकर्णी, रामचंद्र कोटणीस, कुलदीप देवकुळे, आकांक्षा जोशी, आदींनी केले. अपर्णा गोसावी यांनी सूत्रसंचालन केले.

### यांचा झाला सत्कार

शास्त्रीय गायक ऋषिकेश बोडस, लेखक, कवी भीमराव धुळुबुळु, विजयराव कुलकर्णी, तंत्रज्ञ प्रसाद गर्दे, अरुण कापसे, नेपथ्यकार मोहन दिंडे, किशोर चव्हाण, धनश्री गाडगीळ आणि जयसिंगपूर येथील नाट्य शुभांगी नाट्यसंस्था यांना विविध पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

### बदलत्या समाजाची दखल घ्या

यावेळी अतुल पेठे म्हणाले की, नवी नाटके फारशी येत नाहीत. १९९० नंतर राजकारण, समाजकारण बदलले आहे. त्याची नाटकात दखल घ्यायला हवी. प्रायोगिक रंगभूमीला नावे ठेवतो, हे योग्य नाही. नाटके खूप होतात, पण प्रयोग एखादाच होतो. परंपरा माहीत असेल तरच समाज पुढे जाईल.


अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद
शाखा सांगली
पुरस्कार


अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद
शाखा सांगली
पुरस्कार
वितरण सोहळा
अखिल भारतीय
मराठी नाट्य परिषद,
शाखा सांगली

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पुरस्कार जाहीर

- ऋषिकेश बोडस, भीमराव धुळुबुळूसह अनेकांना पुरस्कार
- ४ नोव्हेंबर रोजी सांगलीत होणार वितरण
- प्रसिद्ध नाटककार अतुल पेठे, तारा भवाळकर यांची प्रमुख उपस्थिती

प्रतिनिधी
सांगली

अखिल भारतीय नाट्य परिषद शाखा सांगली तर्फे रंगभूमीशी निगडित उल्लेखनिय कार्य करणाऱ्या व्यक्तींना, संस्थांना विविध पुरस्कार देउन सन्मानित करण्यात येत असते. यंदाचे पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हणकर यांनी दिली.

यंदाचे हे आठवे वर्ष असून, यावर्षी काकासाहेब खाडिलकर जीवनगौरव पुरस्कार, ऋषिकेश बोडस, आचार्य अत्रे प्रतिभा रंग पुरस्कार भीमराव धुळूबुळू, नाना ताडे नाट्यस्वर पुरस्कार विजयराव कुलकर्णी, अरुण पाटील नाट्य तंत्र पुरस्कार प्रसाद गद्रे, दिलीप परदेशी नाट्यरंग पुरस्कार अरुण कापसे, श्रीनिवास शिंदगी बालरंगभूमी पुरस्कार मोहन दिंडे, विशेष सन्मान पुरस्कार नाट्यशुभांगी नाट्यसंस्था जयसिंगपूर, डॉ. मधु आपटे कलावंत पुरस्कार किशोर चव्हाण, धनश्री गाडगीळ यांना जाहीर करण्यात आला आहे.

सोमवार ४ नोव्हेंबर रोजी भावे नाट्यगृह येथे सायंकाळी पाच वाजता पुरस्कार सोहळा आयोजित केला आहे. प्रसिद्ध नाटककार अतुल पेठे आणि लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक, ९८ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या नियोजित अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा पार पडणार आहे. यावेळी 'नमन नटवरा' हा पुरस्कार प्रदान समारंभापूर्वी, निवडक नाट्यगीतांचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. यामध्ये सुकृत ताम्हनकर, धनश्री गाडगीळ सहभाग नोंदविणार आहेत. तर त्यांना विनायक हसबनीस (तबला), श्रेयस कुलकर्णी (ऑर्गन) साथ देणार आहेत. यावेळी सर्व नाट्यरसिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन परिषदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

याचे आयोजन डॉ. भास्कर ताम्हनकर यांच्यासह अंजली भिडे, विशाल कुलकर्णी, प्रशांत जगताप, अपर्णा गोसावी, श्रीनिवास जरंडीकर, सचिन पारेख, प्रशांत गोखले, मकरंद कुलकर्णी, रामचंद्र कोटणीस, कुलदीप देवकुळे आदींनी केले आहे.